


सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २२२ • सोमवार दि.१ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## विधानपरिषदेसाठी अमरनाथ राजूरकर,जवळगावकर, खराटे,सुमठाणकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या आज (सोमवार) शेवटच्या दिवशी भाजप व महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर, काँग्रेस पक्षातर्फे माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर, रामदास पाटील सुमठाणकर व शिवसेना (उबाठा) पक्षाचे जिल्हाप्रमुख ज्योतीबा खराटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाची निवडणूक अत्यंत चुरशीची होणार हे आता स्पष्ट झाले आहे. महायुतीच्या जागा वाटपात नांदेड मतदारसंघ हा भाजपला सुटला आहे. भाजप तर्फे माजी आ.अमरनाथ राजूरकर यांना रविवारी उमेदवारी जाहीर करण्यात आली. महाविकास आघाडीत मात्र चर्चेचे गुऱ्हाळ सुरुच आहे. शिवसेना (उबाठा) पक्षातर्फे खा.नागेश पाटील आष्टीकर यांचे चिरंजीव कृष्णा पाटील आष्टीकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातर्फे प्रविण पाटील चिखलीकर यांनीही यापूर्वीच अर्ज दाखल केलेला आहे. चिखलीकर यांच्या अर्जाकडे सर्वांचेच लक्ष लागले असून त्यांनी जर उमेदवारी अर्ज कायम ठेवला तर या निवडणुकीत मोठी चुरस निर्माण होणार आहे. खा.अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीत माजी आ.अमरनाथ राजूरकर यांनी उमेदवारी अर्ज जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल केला. यावेळी खा.डॉ.अजित गोपछडे, आ.डॉ.तुषार राठोड, आ.श्रीजया चव्हाण, आ.राजेश पवार, महापौर कविता मुळे, संजय कौडगे, प्रदेश उपाध्यक्ष ॲड.चैतन्य देशमुख, संजय देशमुख लहानकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. काँग्रेस पक्षाच्यावतीने माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर व रामदास पाटील सुमठाणकर यांनी उमेदवारी दाखल केली आहे. शिवसेना (उबाठा) पक्षाचे पान ४ वर

## मान्सूनचे केरळमध्ये आगमन; राज्यात मात्र आणखी प्रतीक्षाच

### हवामान विभागाची माहिति

मुंबई/प्रतिनिधी-शेतकऱ्यांसह सर्वांचे लक्ष लागून असलेला मान्सून आज केरळात दाखल झाला आहे. महाराष्ट्रात मात्र मान्सूनची आणखी काही दिवस प्रतीक्षाच करावी लागेल अशी माहिती हवामान विभागाकडून आज देण्यात आली.

देशभरातील शेतकरी आणि नागरिकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली असून भारतीय हवामान विभागाने केरळमध्ये नैऋत्य मान्सून दाखल झाल्याची अधिकृत घोषणा केली आहे. त्यामुळे आता मान्सून दक्षिण भारतातून पुढे सरकत महाराष्ट्रासह देशाच्या इतर भागांकडे वाटचाल करणार आहे. मात्र महाराष्ट्रातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना मान्सूनच्या दमदार सरींसाठी आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

सध्या राज्यात अनेक ठिकाणी पडणारा पाऊस हा मान्सूनपूर्व पाऊस असून त्याचा मान्सूनच्या अधिकृत आगमनाशी संबंध नाही. हवामान विभागाच्या अंदाजानुसार किमान १० जूनपर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सून दाखल होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरण्या न करता दमदार पाऊस आणि अधिकृत मान्सून आगमनाची खात्री झाल्यानंतरच पेरणीचे नियोजन करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.हवामान विभागाने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशातील काही भागांत दुपारनंतर ढगाळ वातावरणासह वादळी पावसाचा अंदाज वर्तविला आहे.

## 'लाडकी बहिण'अपात्रतेवरुन आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी

### ८० लाख लाडक्या बहिणी अपात्र;आदिती तटकरेंकडून इन्कार

मुंबई/प्रतिनिधी-मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील ८० लाख लाभार्थी ई केवायसीमुळे अपात्र ठरणार असल्याचे वृत्त येताच विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून हल्ला चढवला आहे. सरकारने मात्र योजना बंद होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. दरम्यान राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विरोधकांच्या आरोपांचे खंडन केले आहे.



लाडकी बहीण योजनेतील तब्बल ८० लाख लाभार्थी महिलांना ई-केवायसी पूर्ण न केल्यामुळे अपात्र ठरवण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर राज्यातील राजकारण तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी सरकारच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले. राज्याची आर्थिक तूट वाढत असून जागतिक मंदीचाही परिणाम होत असल्याचा दावा करत जयंत पाटील यांनी भविष्यात पान ४ वर

## कॉकरोच जनता पार्टीचे ६ जून रोजी दिल्लीत आंदोलन

### नीट प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

नवी दिल्ली:कॉकरोच जनता पार्टीच्यावतीने ६ जून रोजी शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन छेडणार असल्याची माहिती कॉकरोच पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी आपल्या एक्स खात्यावर कॉकरोच इज बॅक अशी पोस्ट करत भारतात परतण्याची माहिती दिली. स्वतः दिपके हे अमेरिकेतून ६ रोजी भारतात येणार आहेत.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी केलेल्या कॉकरोच संदर्भातील वक्तव्यानंतर सोशल मीडियावर कॉकरोच जनता पार्टी या व्यंगात्मक प्लॅटफॉर्मची मोठी चर्चा झाली होती. सीजेपीच्या इन्स्टाग्राम खात्याला २ कोटींपेक्षा अधिक फॉलोअर्स असून या प्लॅटफॉर्मने अल्पावधीत मोठी लोकप्रियता मिळवली आहे.छत्रपती संभाजीनगरचे रहिवासी असलेले ३० वर्षीय अभिजीत दीपके हे डिजिटल मीडिया स्ट्रॅटेजिस्ट आहेत. सध्या ते अमेरिकेत वास्तव्यास असून शेतकरी आंदोलन, महागाई आणि विविध राजकीय विषयांवरून केंद्र सरकार व पंतप्रधानांवर सातत्याने टीका करत आहेत.दरम्यान, कॉकरोच जनता पार्टीचे एक्स खाते सध्या बंद आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने २९ मे रोजी खातेवरील बंदी तात्काळ उठवण्यास नकार देत केंद्र सरकार आणि एक्सकडून चार आठवड्यांत उत्तर मागितले आहे. न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौर यांच्या खंडपीठाने सरकारची बाजू ऐकल्याशिवाय कोणताही आदेश देता येणार नसल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणाची पान ४ वर




आ.बालाजी कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त मरळक बु. येथे ह.भ.प.विशाल महाराज कोल्हे यांचा किर्तन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ.आनंदराव बोंढारकर, गंगाधर बडुरे, नारायण कदम, नगरसेवक संदीपसिंघ गाडीवाले, तुलजेश यादव यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गंगाबेट नदी घाटावर पोलीसांची धाड;२ कोटी रुपयांचा ऐवज जप्त



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड तालुक्यातील मौजे गंगाबेट शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून अवैध उपसा सुरु असलेल्या ठिकाणी रविवारी रात्री नांदेड ग्रामीण पोलीसांनी धाड टाकली. घटनास्थळावरुन पोलीसांनी २ कोटी १५ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला असून दहा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गंगाबेट शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून मोठ्या प्रमाणात रेतीचा अवैध उपसा रेती तस्कर करीत असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर, फौजदार बाबुराव चव्हाण व पोलीस कर्मचाऱ्यांनी रविवारी रात्री साडेदहाच्या सुमारास गंगाबेट नदी घाटावर छापा टाकला. पोलीसांना बघुन रेती तस्कर व रेती उपसा करणारे मजूर अंधाराचा फायदा घेवून पळून गेले. पोलीसांनी घटनास्थळावरुन दोन हायवा टिप्पर, एक ट्रॅक्टर, दोन मोठी लोखंडी बोट, दोन फायबर बोट, पाण्यात तरंगणारे ५२ तराफे, ११ इंजिन व ११३ ब्रास रेतीचा साठा असा २ कोटी १५ लाख रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला. घटनास्थळी पंचासमक्ष पोलीसांनी तराफे जाळून नष्ट केले आहेत. पोलीस शिपाई हणमंत तेलंग यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात बालाजी अशोक सांगळे रा.बामणी, बळीराम गोवर्धन चव्हाण रा.लिंबोटी तांडा, अशोक मोरे रा.सोनखेड, अतुल प्रभाकर गच्चे रा.जवळा व इतर अनोळखी सहा अशा दहा जणांविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# स्वर वैभवाचा शांत झालेला झरा...!



भारतीय चित्रपट संगीताच्या सुवर्ण युगातील एक अत्यंत मधुर, संयत आणि संस्कारित स्वर काळाच्या पडद्याआड गेला आहे. ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांच्या निधनाने भारतीय संगीतविश्वाने एक महत्त्वाचा सांस्कृतिक वारसा जपणारी कलावंत गमावली आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एका गायिकेचा अंत झालेला नाही, तर भारतीय चित्रपट संगीतातील सौंदर्य, शालीनता आणि सुरेलतेच्या एका परंपरेलाच विराम मिळाला आहे. अनेक दशकांपर्यंत आपल्या स्वरांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या सुमनताई आज आपल्यात नसल्या, तरी त्यांची गाणी आणि त्यांचे संगीतस्मरण पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील.संगीत क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणे हे कोणत्याही कलाकारासाठी आव्हानात्मक असते. विशेषतः ज्या काळात लता मंगेशकर, अशा भोसले आणि इतर दिग्गज गायक-गायिका आपल्या कर्तृत्वाच्या शिखरावर होत्या, त्या काळात सुमन कल्याणपूर यांनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. त्यांच्या आवाजात एक विलक्षण कोमलता, भावस्पर्शीपणा आणि नितळपणा होता. प्रत्येक गाण्यातील भावार्थ श्रोत्यांच्या मनापर्यंत सहज पोहोचविण्याची ताकद त्यांच्या स्वरात होती. त्यामुळेच त्यांनी गायलेली गाणी आजही तितकीच ताजी आणि लोकप्रिय वाटतात.सुमनताईंच्या कारकिर्दीतील अनेक गीते आजही भारतीय संगीत संपदेचा अविभाज्य भाग आहेत.''आज कल तेरे मेरे प्यार के चर्चे'',''तुमने पुकारा और हम चले आये'',''ना ना करते प्यार तुम ही से कर बैठे'',''दिल एक मंदिर है'' यांसारख्या हिंदी गीतांनी त्यांना घराघरांत पोहोचवले. त्याचप्रमाणे मराठी भावसंगीतात ''केतकीच्या बनी तिथे'',''मृदुल करांनी छेडित तारा'',''नाविका रे वारा वाहे'',''या झोपडीत माझ्या'' यांसारख्या गीतांनी त्यांनी रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. या गीतांमध्ये केवळ सुरेलता नव्हती, तर भावनांचा एक जिवंत प्रवाह होता. म्हणूनच काळ बदलला, पिढ्या बदलल्या तरी ही गाणी आजही तितक्याच प्रेमाने ऐकली जातात.त्यांच्या आवाजाची तुलना अनेकदा लता मंगेशकर यांच्या स्वरांशी करण्यात आली. काही गाणी ऐकताना श्रोत्यांना दोघींमधील साधर्म्य जाणवत असे. मात्र या तुलनेच्या पलीकडे जाऊन पाहिले तर सुमन कल्याणपूर यांची स्वतःची स्वतंत्र शैली होती. त्यांच्या गायकीत कृत्रिमता नव्हती; भावनांचा अतिरेक नव्हता; तर एक सहज आणि नैसर्गिक अभिव्यक्ती होती. त्यांनी आपल्या आवाजातून गीतकाराच्या शब्दांना आणि संगीतकाराच्या कल्पनांना न्याय दिला. म्हणूनच त्यांची गाणी आजही अभिजात संगीताच्या श्रेणीत गणली जातात.त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचा साधेपणा. आजच्या काळात प्रसिद्धी, चर्चेत राहणे आणि सामाजिक माध्यमांवरील उपस्थिती हे यशाचे निकष मानले जातात. मात्र सुमनताईंनी कधीही प्रसिद्धीचा पाठलाग केला नाही. त्यांनी आपल्या कलेलाच आपली ओळख बनू दिली. कोणत्याही वादविवादांपासून दूर राहून त्यांनी संगीत साधना केली. त्यांच्या या वृत्तीमुळे त्या केवळ उत्तम गायिका नव्हत्या, तर कलाक्षेत्रातील सुसंस्कृत आणि विनम्र व्यक्तिमत्त्व म्हणूनही ओळखल्या जात होत्या.सुमन कल्याणपूर यांच्या निधनाच्या निमित्ताने भारतीय संगीतविश्वाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आज संगीताचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. तंत्रज्ञानामुळे संगीत निर्मिती सुलभ झाली असली, तरी शब्दांची संवेदनशीलता, सुरांची शिस्त आणि भावनांची सखोलता यांचे महत्त्व कमी होत चालल्याची खंत व्यक्त केली जाते. सुमनताईंची गाणी ऐकताना संगीत हे केवळ मनोरंजन नसून एक सांस्कृतिक मूल्य आहे, याची जाणीव होते. त्यांच्या स्वरांमध्ये भारतीय संगीत परंपरेचे सौंदर्य आणि संस्कार प्रतिबिंबित होत होते.खरे कलाकार शरीराने दूर जातात; परंतु त्यांच्या कलाकृती त्यांना अमरत्व देतात. सुमन कल्याणपूर यांच्याबाबतही हेच सत्य आहे. त्यांच्या स्वरांनी सजलेली असंख्य गीते आजही रेडिओवर, संगीत मैफिलींमध्ये आणि रसिकांच्या स्मरणात घुमत राहतील. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे कठीण असले, तरी त्यांनी दिलेला संगीताचा अमूल्य ठेवा भारतीय सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग राहील. भारतीय संगीतविश्व त्यांच्या योगदानाचे सदैव ऋणी राहील आणि त्यांचा मधुर स्वर काळाच्या प्रवाहातही चिरंतन घुमत राहील.

# ग्रेट निकोबारवरुन नवा संघर्ष! पर्यावरण की राष्ट्रीय सुरक्षा?

गौतम चिकरमाने

ग्रेट निकोबार प्रकल्पाभोवती सुरू असलेला राजकीय वाद समजून घेण्यासाठी भारताच्या नैसर्गिक विमानवाहू जहाज किंवा कधीही न बुडणाऱ्या कॅरियर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या बेटाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. लक्ष केवळ जमिनीवरून समुद्राकडे आणि केवळ विकासावरून सुरक्षेकडे वळवण्याची आवश्यकता आहे. ग्रेट निकोबार हे फक्त १,०४५ चौ. किमी. क्षेत्रफळाचं बेट नाही. ते भारताच्या दक्षिणेकडील अखेरच्या टोकावर असलेल्या बेटसमूहाचा भाग आहे, जो विशेष आर्थिक क्षेत्रामुळे (EEZ) भारताच्या आर्थिक भूगोलात तब्बल ०.६ दशलक्ष चौ. किमी.ची भर घालतो. याचा संदर्भ समजून घ्यायचा झाल्यास, अंदमान-निकोबार बेटसमूहाचं EEZ हे राजस्थान आणि मध्यप्रदेश या दोन्ही राज्यांच्या एकत्रित क्षेत्रफळाच्या जवळपास आहे. तसेच ते युक्रेन, फ्रान्स किंवा स्पेनच्या भूभागापेक्षाही मोठं आहे.

### केवळ प्रेक्षक म्हणून...

मलक्का सामुद्रधुनीपासून अवघ्या ४० नॉटिकल मैलांवर, म्हणजेच सुमारे ७४ किमी अंतरावर-जे कोहिमा-दीमापूर किंवा मस्टरडॅम-रॉटरडॅममधील अंतराइतके आहे. ग्रेट निकोबार बेट आतापर्यंत केवळ एक मूक साक्षीदार राहिले आहे. जगातील जवळपास ३० टक्के व्यापार ज्या जलमार्गातून होतो आणि जो फक्त २.५ किमी रुंद आहे, त्या मार्गाकडे हे बेट शांतपणे पाहत राहिले आहे. जागतिक समुद्री तेलवाहतुकीपैकी सुमारे २९ टक्के वाहतूक या मार्गातून होते. त्यापैकी ७० टक्के हिस्सा कच्च्या तेलाचा असून उर्वरित हिस्सा पेट्रोलियम उत्पादनांचा आहे. पश्चिम आशियातील तेल आणि वायू उत्पादक देशांना पूर्व आणि आग्नेय आशियातील वेगाने वाढणाऱ्या ग्राहक बाजारांशी जोडणारा हा सर्वात लहान समुद्री मार्ग मानला जातो. या मार्गातून होणाऱ्या आयातीत चीनचा हिस्सा सुमारे ४८ टक्के आहे.

मलक्का सामुद्रधुनीचं महत्त्व भारतासाठीही वाढत चाललं आहे. ज्या काळात ऊर्जा मार्गांचा वापर भू-राजकीय दबावासाठी केला जात आहे. जसं अमेरिका आणि इराणदरम्यान होर्मुझ सामुद्रधुनीच्या संदर्भात दिसून आलं, त्या पार्श्वभूमीवर मलक्का सामुद्रधुनी भारतासाठीही महत्त्वाची ठरते. पूर्व आणि आग्नेय आशियाकडे होणाऱ्या भारताच्या निर्यातीसाठी आणि रशियाकडून होणाऱ्या तेल आयातीसाठी हा एक अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. ही सामुद्रधुनी भारताविरोधात कोणत्याही परिस्थितीत वापरली जाऊ नये. भारताच्या ऊर्जा पुरवठा आणि निर्यात साखळीचं संरक्षण करण्यासाठी सामरिक प्रतिबंधात्मक क्षमता उभारणं आवश्यक आहे. या बेटसमूहाच्या उत्तरेकडील टोकावर अंदमान आणि निकोबार कमांड (ANC) आहे. त्याचा विस्तार ग्रेट निकोबारपर्यंत केल्यास संपूर्ण ७८० किमी लांबीच्या बेटसमूहावर सामरिक नियंत्रण प्रस्थापित करता येऊ शकतं. हे अंतर साधारण नवी दिल्ली आणि वाराणसीदरम्यानच्या अंतराइतकं आहे.

या सामरिक प्रतिबंधात्मक व्यवस्थेचा दक्षिणेकडील महत्त्वाचा बिंदू म्हणजे ग्रेट निकोबार प्रकल्प. त्यामुळे या प्रकल्पाकडे केवळ भारताच्या राजकीय अर्थकारणाच्या चौकटीतून पाहणं चुकीचं ठरू शकतं. नर्मदा, नियमगिरी आणि नंदीग्रामपासून विविध विकास प्रकल्पांविरोधातील आंदोलनांनी भारताच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. काही ठिकाणी आंदोलकांना यश मिळालं, जेव्हा पश्चिम बंगालमधील नंदीग्राम आणि ओडिशातील नियमगिरी तर काही ठिकाणी आंदोलनांना पराभव स्वीकारावा लागला, जसं गुजरातमधील नर्मदा किंवा तामिळनाडूमधील कुडनकुलम प्रकल्पांच्या बाबतीत घडलं. या संघर्षांच्या केंद्रस्थानी विस्थापन, पुनर्वसन, भरपाई, दरनिर्धारण आणि स्वयंसेवी संस्था तसेच विरोधी पक्षांची भूमिका हे मुद्दे राहिले आहेत.

### आंदोलनांच्या राजकारणापासून पुढे...

गेल्या शतकातील आंदोलनांचं राजकारण आजच्या अस्थिर २१व्या शतकात किंवा बंगालच्या उपसागराच्या बदलत्या सामरिक वास्तवात तितकंसं प्रभावी राहिलेलं नाही. आता आंदोलनांची पद्धत जवळपास ठरलेली दिसते : एखाद्या प्रकल्पाची घोषणा होते, नकाशे तयार होतात, मंत्र्यांकडून भूमिपूजन किंवा उद्घाटन केलं जातं, निधीची तरतूद होते, काम सुरू होतं आणि त्यानंतर आंदोलनं उभी राहतात. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी धरणांना आधुनिक भारताची मंदिरं म्हटल्यानंतर सुरू झालेला विकास विरुद्ध विस्थापनाचा वाद पुन्हा पुढे येतो.भूतकाळातील आंदोलनांच्या राजकारणाने विकास आणि विस्थापनासंदर्भात अनेक महत्त्वाचे आणि वैध प्रश्न उपस्थित केले होते. मात्र, आज या चर्चांना अधिक व्यापक जागतिक संदर्भात पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. भारतासह जगभरातील सरकारं वाढत्या भू-राजकीय अस्थिरतेच्या काळातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा परिस्थितीत सुरक्षा हा झपाट्याने बदलणारा आणि सर्वात महत्त्वाचा घटक बनला आहे.

१९७० च्या दशकाच्या मध्यातील चिपको आंदोलनापासून १९८० च्या दशकातील नर्मदा बचाव आंदोलन आणि २०१० च्या दशकाच्या सुरुवातीच्या कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्पविरोधी आंदोलनांपर्यंत, भारतामध्ये पायाभूत सुविधा उभारण्याच्या गरजा आणि स्पर्धात्मक राजकारण तसेच विविध वैचारिक आणि आर्थिक हितसंबंधांवर चालणाऱ्या स्वयंसेवी संस्थांमध्ये सातत्याने संघर्ष दिसून आला आहे. संसाधन सुरक्षित करण्यासाठी किंवा जागतिक स्तरावर स्पर्धात्मक उद्योग उभारण्यासाठी पुढे आलेल्या खासगी कंपन्यांनाही अनेकदा माघार घ्यावी लागली, जसं नियमगिरी आंदोलन किंवा जगतसिंगपूरच्या प्रकरणांमध्ये घडलं.

गुजरातमधील नर्मदा नदीवरील सरदार सरोवर धरणातून आज ९,००० हून अधिक गावांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र, विस्थापितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आजही पूर्णपणे संपलेला नाही. ओडिशातील नियमगिरी पर्वतरांगांमध्ये २०१३ मध्ये १,४५३ डोंगरिया कोंध आदिवासींनी वेदांत कंपनीच्या बॉक्साइट खाण प्रकल्पाला विरोध दर्शवला होता. त्यानंतर हे प्रकरण विकास विरुद्ध स्थिती कायम ठेवण्याच्या वादातील एक महत्त्वाचं उदाहरण बनलं. पश्चिम बंगालमधील सिंगूर आणि नंदीग्राम आंदोलनांनीही राज्याच्या राजकारणाला मोठं वळण दिलं. सिंगूरमध्ये टाटा नॅनो प्रकल्पाविरोधात आणि नंदीग्राममध्ये सलीम समूहाच्या विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) प्रकल्पाविरोधात झालेल्या आंदोलनांनी २०११ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये डाव्या आघाडीच्या पराभवाला हातभार लावला. परिणामी, राज्यातील ३४ वर्षांची कम्युनिस्ट सत्ता संपुष्टात आली. दक्षिण कोरियाच्या POSCO कंपनीचा ओडिशातील जगतसिंगपूर येथे प्रस्तावित पोलाद प्रकल्पही अखेर २०१७ मध्ये कोसळला. जवळपास दशकभर स्थानिक समुदायांनी विरोध केला होता, कारण त्यांच्या पानवेलीच्या शेतीवर या प्रकल्पाचा परिणाम होणार होता. मात्र, हा प्रकल्प पुन्हा सुरू करण्याच्या हालचाली आता दिसू लागल्या आहेत.

प्रत्येक वेळी भारताच्या आर्थिक महत्त्वाकांक्षा आणि त्याचं राजकारण यांच्यात संघर्ष झाला आणि त्यातून एकच प्रकारची अनिश्चितता निर्माण झाली. विकासाच्या लोकाभिमुख अपेक्षा आणि सत्ताधाऱ्यांची त्यासाठी आवश्यक जागा निर्माण करण्याची अनिच्छा यांच्यातील संघर्ष. विकास या संकल्पनेचाही अर्थ काळानुसार वेगवेगळ्या पद्धतीने बदलत गेला आहे. निवडून आलेल्या सरकारांसाठी त्याचा एक अर्थ, स्वयंसेवी संस्था आणि विरोधकांसाठी दुसरा, तर न्यायव्यवस्थेसाठी तिसरा अर्थ दिसून आला. याच चर्चांवर सांस्कृतिक कथनांचाही प्रभाव राहिला आहे. नियमगिरी आंदोलनादरम्यान समोर आलेली अवतार चित्रपटाशी केलेली तुलना हे त्याचं एक उदाहरण मानलं जातं.

### ...प्रेक्षकापासून सक्रिय सामरिक उपस्थितीकडे

ग्रेट निकोबार प्रकल्प या संपूर्ण चर्चेची भाषा बदलतो. या प्रकल्पामध्ये ऊर्जा सुरक्षा, व्यापारी समुद्री मार्ग, सामरिक प्रतिबंधात्मक क्षमता आणि प्रादेशिक स्तरावर भारताची व्यापक भूमिका यांसारखे मुद्दे केंद्रस्थानी आहेत. इथे भारताची लवचिक राजकीय अर्थव्यवस्था आणि तडजोड न करता येणारी सामरिक गरज एकमेकांसमोर उभी राहते. भूतकाळातील आंदोलनांच्या राजकारणाने विकास आणि विस्थापनासंदर्भात अनेक वैध प्रश्न उपस्थित केले होते. मात्र, आज त्या चर्चांना अधिक व्यापक जागतिक संदर्भात पाहण्याची गरज



निर्माण झाली आहे, जिथे भारतासह अनेक देश अस्थिर भू-राजकीय परिस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करत आहेत. सुरक्षा हा सर्वांत व्यापक आणि झपाट्याने बदलणारा घटक बनत असल्याने या चर्चांनाही बदलणाऱ्या वास्तवाशी जुळवून घ्यावं लागणार आहे.

बंदरं, विमानतळ आणि इतर पायाभूत सुविधांद्वारे होणारा विकास केवळ व्यापार सुलभ करण्यापुरता मर्यादित राहणार नाही. सिंगापूरसारखं मोठं पर्यटन आणि निवासी केंद्र म्हणून विकसित होण्याची शक्यता ही त्याची दुय्यम बाजू मानली जाते. या प्रकल्पामागील मुख्य प्रेरक शक्ती संरक्षण व्यवस्था असेल, जी लष्करी पायाभूत सुविधा उभारून या भागात भारताची सामरिक उपस्थिती मजबूत करेल. होनोलुलू येथे मुख्यालय असलेल्या अमेरिकेच्या इंडो-पॅसिफिक कमांडने आपल्या कार्यक्षेत्रात पर्यावरणीय संवेदनशीलता आणि सामरिक गरजा यांच्यात समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा अनुभव ग्रेट निकोबारसाठी एक उपयुक्त नमुना ठरू शकतो. ग्रेट निकोबार बेटाचं प्राथमिक स्वरूप हे समुद्री आणि सामरिक केंद्र म्हणून विकसित होण्याचं असेल. त्याभोवती व्यापार, पर्यटन आणि शिक्षण क्षेत्रांचा विस्तार होऊ शकतो.

### जमीन अधिग्रहण आणि आदिवासी संरक्षण

भारतामधील जमीन अधिग्रहणाशी संबंधित कायदेशीर यंत्रणा अनेक आणि गुंतागुंतीच्या स्वरूपाच्या आहेत. जम्मू आणि काश्मीर रिक्विझिशनिंग अँड क्विझिशन ऑफ इमूव्हेबल प्रॉपर्टी क्ट, १९६८ सह एकूण सोळा जमीन अधिग्रहण कायदे अस्तित्वात आहेत. त्यापैकी तीन कायदे हे भारताच्या वसाहतवादी काळातील वारशाचा भाग आहेत. याशिवाय संरक्षण क्षेत्राशी संबंधित तीन स्वतंत्र कायदे आहेत. वर्क्स ऑफ डिफेन्स क्ट, १९०३; डिफेन्स ऑफ इंडिया क्ट, १९७१; आणि कॅन्टोनमेंट्स क्ट, २००६. राइट टू फेअर कॉम्पेन्सेशन अँड ट्रान्सपरन्सी इन लँड क्विझिशन, रिहॅबिलिटेशन अँड रिसेटलमेंट क्ट, २०१३ हा कायदा संरक्षण क्षेत्राशी संबंधित कायद्यांव्यतिरिक्त इतर सर्व अधिग्रहण प्रक्रियांना लागू होतो. जमीन हस्तांतरण प्रक्रियेवर देखरेख ठेवणं आणि आर्थिक संरक्षण सुनिश्चित करणं, ही या कायद्याची प्रमुख उद्दिष्टं आहेत.

या बेटावर राहणाऱ्या आदिवासी समुदायांचे हितसंबंध हा प्रकल्पाच्या रचनेतील महत्त्वाचा घटक मानला जात आहे. बेटावर राहणारे २३७ शोम्पेन समुदायातील शिकारी-संकलक आणि मासेमारीवर अवलंबून असलेले १,०९४ निकोबारी लोक यांच्यावर या प्रकल्पाचा परिणाम होणार असल्याने त्यांच्या संरक्षणाचा मुद्दा केंद्रस्थानी आहे. सरकारने कोणत्याही समुदायावर प्रतिकूल परिणाम होणार नसल्याचं आणि आदिवासींचं विस्थापन होऊ दिलं जाणार नसल्याचं स्पष्ट केलं आहे. पुढे मांडलेली जमीन वापर रचना या आश्वासनांची अंमलबजावणी करण्यासाठी तयार करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे.

ग्रेट निकोबार बेटाच्या एकूण भूभागापैकी ७५१.०७ चौ. किमी. क्षेत्र अधिकृतपणे आदिवासी राखीव क्षेत्र म्हणून चिन्हांकित करण्यात आलं आहे. ग्रेट निकोबार प्रकल्पासाठी एकूण १६६.१० चौ. किमी. जमीन वापरली जाणार आहे. त्यापैकी ८४.१० चौ. किमी., म्हणजे जवळपास निम्मा भाग, आदिवासी राखीव क्षेत्राशी संबंधित आहे. या ओव्हरलॅप होणाऱ्या क्षेत्रापैकी ११.०३ चौ. किमी., म्हणजेच सुमारे १३.१ टक्के भाग, १९७२ पासून महसुली जमीन म्हणून वापरला जात आहे. उर्वरित ७३.०७ चौ. किमी. क्षेत्र प्रकल्पासाठी राखीव क्षेत्रातून वगळण्यात येत आहे. त्याबदल्यात ७६.९८ चौ. किमी. क्षेत्र पुन्हा आदिवासी राखीव क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्यात येत असून त्यामुळे निव्वळ ३.९१ चौ. किमी.ची वाढ होत आहे.आवश्यकता आहे ती अशा सर्जनशील विचारांची, ज्यामध्ये आधुनिक शहरी वसाहती विद्यमान हिरव्या परिसंस्थेमध्ये मिसळल्या जातील, पण त्यातून पर्यावरणीय समतोल बिघडणार नाही किंवा आदिवासी समुदायांचं विस्थापन होणार नाही. या समुदायांना विकास प्रक्रियेतील भागीदार बनवणं हे स्वतः विकासाइतकंच महत्त्वाचं ठरणार आहे.

ही जमीन वापर रचना विकास आणि आदिवासी संरक्षण यांच्यात संतुलन साधण्याचा प्रयत्न करत असली, तरी दीर्घकालीन दृष्टीने प्रकल्पाच्या महत्त्वाकांक्षांसाठी उपलब्ध करून दिलेली जमीन पुरेशी ठरेल का, याबाबत प्रश्न कायम आहेत. लोकशाही व्यवस्थेमधील मर्यादा आणि तडजोडींमुळे अशा प्रकारचं संकुचित नियोजन अपरिहार्य असू शकतं. मात्र, त्यातून अल्पकालीन दृष्टिकोनाचं नियोजन तयार होण्याचा धोका निर्माण होतो. जर या बेटाची कल्पना मोठ्या लष्करी, सामरिक आणि व्यापारी केंद्र म्हणून केली जात असेल, तर त्याचं नियोजन काही दशकांसाठी नव्हे तर शतकांच्या दृष्टीने केलं जाणं आवश्यक आहे. प्रकल्पासाठी राखीव ठेवलेलं १६६.१० चौ. किमी. क्षेत्रफळ हे फ्रँकफर्ट शहराच्या निम्म्या आकाराएवढं, चेन्नईच्या चौथ्या भागाएवढं आणि नवी दिल्लीच्या बाराव्या भागाएवढं असेल. ते नेवेली लिग्नाइट कॉर्पोरेशनच्या एकूण भूधारणेपेक्षाही कमी आहे. यासाठी सर्वात जवळचं उदाहरण म्हणजे होनोलुलू. होनोलुलूचं शहरी क्षेत्रफळ सुमारे १७७.२ चौ. किमी. आहे. ते उत्तर-पश्चिम ते दक्षिण-पूर्व दिशेने पसरलेल्या १३७ बेटं आणि टॉल्सच्या साखळीचा भाग आहे. त्याचप्रमाणे अंदमान-निकोबार बेटसमूहामध्ये उत्तर ते दक्षिण दिशेने पसरलेली ८३६ बेटं आणि बेटकुळ्या आहेत.

ही आकडेवारी केवळ सांख्यिकीय तुलना नाही. ती अनेक व्यावहारिक आणि कार्यकारी प्रश्नही उपस्थित करते. जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारणं हे प्रकल्पाच्या यशासाठी आवश्यक असलं, तरी केवळ त्यावरून जागतिक दर्जाचं मनुष्यबळ आकर्षित होईल, असं मानता येणार नाही. प्रतिभावान मनुष्यबळासोबत त्यांची कुटुंबही येतात आणि त्या कुटुंबांना शाळा, बाजारपेठा, विद्यापीठं आणि रुग्णालयांची गरज असते. हार्बर मास्टर्स, टर्मिनल मॅनेजर्स किंवा पोर्ट डायरेक्टर्ससारख्या उच्चस्तरीय बंदर व्यवस्थापन तज्ज्ञांनी कुटुंबांशिवाय स्थलांतर करावं, अशी अपेक्षा ठेवणं मर्यादित दृष्टिकोन ठरू शकतो. अशा प्रकारची व्यवस्था नौदलातील अधिक शिस्तबद्ध अधिकारी आणि जवानांसाठी मिडशिपमनपासून डमिरलपर्यंत काही प्रमाणात कार्य करू शकते, कारण त्यांना कठीण क्षेत्र भत्ते दिले जातात. मात्र, नागरी मनुष्यबळासाठी हे मॉडेल प्रभावी ठरणार नाही.

### जोखमीचे क्षेत्र

अंदमान-निकोबार बेटसमूह हा भारतातील सर्वाधिक भूकंपप्रवण मानल्या जाणाऱ्या सिस्मिक झोन V मध्ये येतो. त्यामुळे हे क्षेत्र भूकंपांच्या दृष्टीने संवेदनशील मानलं जातं. मात्र, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, गुजरातमधील रण ऑफ कच्छ आणि उत्तर बिहारमधील काही भागही याच प्रकारच्या भूकंपीय जोखमीखाली येतात. तरीही, या प्रदेशांमध्ये केवळ भूकंपाच्या धोक्याच्या आधारावर विकास थांबवण्यात आलेला नाही. जगातील आणखी तेरा देशांमध्ये भारतापेक्षा अधिक प्रमाणात भूकंप होतात. इंडोनेशिया, मेक्सिको, जपान, चीन, अर्जेंटिना आणि ग्रीस यांसारखे देश या यादीत आहेत. तरीही, हे देश सातत्याने पायाभूत सुविधा उभारत आहेत, आर्थिक विस्तार करत आहेत आणि शेकडो दशलक्ष लोकसंख्येला आधार देत आहेत.ग्रेट निकोबार बेटावर प्रस्तावित बंदर, दुहेरी वापरासाठीचं विमानतळ, टाउनशिप आणि ऊर्जा प्रकल्प हे बदलत्या भू-राजकीय परिस्थितीत भारताकडून दिल्या जाणाऱ्या अनेक धोरणात्मक उत्तरांपैकी एक ठरू शकतात. शीतयुद्ध संपल्यानंतरच्या काळापासून आजपर्यंतची जागतिक परिस्थिती ही सर्वाधिक अस्थिर मानली जात असताना, या प्रकल्पाकडे त्या व्यापक सामरिक संदर्भात पाहण्याची गरज आहे.

या भौगोलिक असुरक्षिततेचं उत्तर म्हणजे लवचिक आणि टिकाऊ शहरी नियोजन. जर बेटावरील भूभाग उंच इमारतींसाठी अनुकूल नसेल, तर प्रकल्पाला आडव्या दिशेने विस्तार करावा लागेल. अशा परिस्थितीत १६६.१० चौ. किमी. क्षेत्रफळ पुरेसं ठरेल का, हा प्रश्न निर्माण होतो. बेटावरील दाट जंगलं, पाच बारमाही नद्या अलेक्झांड्रा, डॉगमार, अमृता कौर, ज्युबिली आणि गलाथिया तसेच पंचवीस गोड्या पाण्याचे प्रवाह नष्ट करणं म्हणजे अत्यंत विशाल, गुंतागुंतीची आणि नाजूक परिसंस्था उद्ध्वस्त करणं ठरेल. तो पर्याय मान्य होऊ शकत नाही. आवश्यकता आहे ती अशा सर्जनशील विचारांची, ज्यामध्ये आधुनिक शहरी वसाहती विद्यमान हिरव्या परिसंस्थेमध्ये मिसळल्या जातील, पण त्यातून पर्यावरणीय समतोल बिघडणार नाही किंवा आदिवासी समुदायांचं विस्थापन होणार नाही. या समुदायांना विकास प्रक्रियेतील भागीदार बनवणं हे स्वतः विकासाइतकंच महत्त्वाचं ठरणार आहे.

पर्यायी दृष्टिकोनातून पाहिल्यास, ग्रेट निकोबार प्रकल्प हा उत्तर दिशेतील लँडफॉल बेटापासून सुरू होणाऱ्या व्यापक धोरणात्मक दृष्टीकोनाचा दक्षिणेकडील आधारबिंदू ठरू शकतो. या दरम्यानच्या अनेक बेटांना संरक्षण व्यवस्थेच्या छत्राखाली आर्थिक केंद्रं म्हणून विकसित करता येऊ शकतं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, या सर्व बेटांना परस्पर जोडणाऱ्या फेरी सेवा उभारण्याची गरज आहे. या सेवा बेटांमधील वाहतूक आणि पुरवठा साखळीच्या मुख्य धमन्यांप्रमाणे काम करू शकतात आणि त्याचवेळी जगभरातून येणाऱ्या पर्यटनालाही चालना देऊ शकतात. या प्रकल्पामध्ये विमानतळांच्या बाबतीतही मोठ्या प्रमाणावर विचार करण्याची गरज आहे. एक किंवा दोन नव्हे, तर पाच विमानतळांची. बेटसमूहाच्या दोन्ही टोकांना दोन मोठे विमानतळ आणि मध्यभागी तीन लहान विमानतळ उभारण्याची कल्पना मांडली जात आहे. अशा व्यवस्थेमुळे केवळ कनेक्टिव्हिटी सुधारणार नाही, तर स्थानिक समुदायांना आरोग्यसेवा, आवश्यक पुरवठा आणि बेटांमधील परस्पर संपर्क अधिक सुलभ होऊ शकतो.

### भू-राजकारणाची अपरिहार्यता

जगात नव्या प्रकारचं भू-राजकारण आकार घेत आहे. नव्या जागतिक व्यवस्थेची रचना तयार होत आहे, सामरिक दिशांचा पुनर्विचार सुरू आहे आणि या प्रदेशात संरक्षण व्यवस्थेची उपस्थिती अधिक मजबूत होत चालली आहे. तंत्रज्ञान, वित्तव्यवस्था, ऊर्जा मार्ग आणि सामरिक समुद्री अरुंद मार्गांपासून प्रत्येक गोष्ट सत्तेचं साधन म्हणून वापरली जात आहे. आणि जेव्हा प्रत्येक गोष्ट शस्त्र बनते, तेव्हा प्रत्येकजण संभाव्य बळी ठरतो. ग्रेट निकोबार बेटावर प्रस्तावित बंदर, दुहेरी वापरासाठीचं विमानतळ, टाउनशिप आणि ऊर्जा प्रकल्प हे बदलत्या भू-राजकीय परिस्थितीत भारताकडून दिल्या जाणाऱ्या अनेक धोरणात्मक उत्तरांपैकी एक ठरू शकतात. शीतयुद्ध संपल्यानंतरच्या काळापासून आजपर्यंतची जागतिक परिस्थिती ही सर्वाधिक अस्थिर मानली जात असताना, या प्रकल्पाकडे त्या व्यापक सामरिक संदर्भात पाहण्याची गरज आहे. हा प्रकल्प अनियंत्रित शक्तीप्रदर्शनाविरोधात संरक्षणात्मक भिंत म्हणून काम करू शकतो. चुकीच्या राजकीय महत्त्वाकांक्षांमुळे जागतिक परिणाम घडवून आणणाऱ्या युद्धांना आणि लहान देशांना मोठ्या महासत्तांच्या संघर्षांमधील प्रतिनिधी बनवण्याच्या प्रवृत्तीला तो उत्तर ठरू शकतो.प्रत्येक देशाप्रमाणेच, राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला की त्याला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिलं जातं. भारतालाही आता आपला दृष्टिकोन जमिनीवरून समुद्राकडे आणि केवळ अधिकारांच्या चर्चेतून सुरक्षेच्या व्यापक प्रश्नांकडे वळवण्याची गरज आहे.

जंगलं आणि आदिवासी समुदायांबाबत व्यक्त केल्या जाणाऱ्या चिंता वैध आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या भारतातील जवळपास प्रत्येक मोठ्या प्रकल्पासोबत नर्मदा, नंदीग्राम आणि नियमगिरीपासून अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, निकोबारच्या बाबतीत या चिंतांचा विचार अधिक तातडीच्या सामरिक गरजांच्या पार्श्वभूमीवर करावा लागणार आहे. हेही तितकंच खरं आहे की भारताच्या विकासप्रक्रियेची दिशा आणि तिची कसोटी या दोन्ही गोष्टींवर लोकशाही व्यवस्थेचा मोठा प्रभाव राहिला आहे. मात्र, प्रत्येक देशाप्रमाणेच राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला की त्याला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिलं जातं. भारतालाही आता आपला दृष्टिकोन जमिनीवरून समुद्राकडे आणि केवळ अधिकारांच्या चर्चेतून सुरक्षेच्या व्यापक प्रश्नांकडे वळवण्याची गरज आहे. भूतकाळातील वाद आणि आंदोलनं आजच्या चर्चांना संदर्भ देऊ शकतात, पण भविष्यातील गरजा ठरवणाऱ्या वर्तमानाच्या मागण्यांना ते आता पूर्णपणे दिशा देऊ शकत नाहीत.ग्रेट निकोबार प्रकल्प अत्यंत वेगाने पुढे नेण्याची गरज आहे.

(गौतम चिकरमाने हे 'ऑब्झर्वर रिसर्च फाउंडेशन'चे उपाध्यक्ष आहेत.)

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# माहूरमध्ये थंडगार पाण्याच्या नावाखाली नागरिकांच्या जीवाशी खेळ?



## थंड पाण्याच्या जारवर थेट ५० टक्क्यांनी वाढ;शुद्धतेची तपासणी कोण करणार?

माहूर/प्रतिनिधी-उन्हाळा सुरू होताच थंड पाण्याच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. सर्वसामान्य दुकानदारांपासून ते मोठ मोठ्या लग्न समारंभ, सार्वजनिक कार्यक्रम आणि धार्मिक सोहळ्यांपर्यंत सर्वत्र २० लिटरच्या थंड पाण्याच्या जारचा वापर सर्रास होत आहे. मात्र, या वाढत्या मागणीचा फायदा घेत अनेक आरओ प्रकल्प आणि पाणी व्यवसायिकांनी थेट दरवाढीचा फतवा काढला असून २० रुपयांचा जार १ जूनपासून ३० रुपयांना विकण्याचा निर्णय घेतल्याने नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे. दरवाढी इतकाच गंभीर प्रश्न पाण्याच्या शुद्धतेचा आहे. नागरिक पैसे मोजून विकत घेत असलेले हे पाणी खरोखरच सुरक्षित आहे का? याची तपासणी कोण करणार? असा सवाल आता सर्वसामान्यां-मधून उपस्थित होत आहे.

माहूर शहर आणि परिसरात सध्या २० पेक्षा अधिक आरओ प्रकल्प सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र या प्रकल्पांवर ना नगर पंचायतचे नियंत्रण, ना अन्न व औषध प्रशासनाचे, ना आरोग्य विभागाचे! सीलबंद मिनरल वॉटरच्या बाटल्यांवर कडक नियम असताना खुल्या जारमधून विकल्या जाणाऱ्या पाण्यावर कोणाचेच नियंत्रण नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. उन्हाचा पारा वाढताच कॅनमधील थंडगार पाण्याची मागणी प्रचंड वाढली आहे. दिवसाकाठी हजारो लिटर पाण्याची विक्री होत असली तरी या व्यवसायात आरोग्य नियमांची अक्षरशः पायमल्ली होत असल्याचा आरोप नागरिकांतून केला जात आहे. अनेक ठिकाणी विहीर किंवा कूपनलिकेचे पाणी कोणतीही शुद्धीकरण प्रक्रिया न करता थंड करून थेट ग्राहकांच्या गळ्यात मारले जात असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे प्रत्येक लग्न समारंभ, धार्मिक कार्यक्रम, मेळावे आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये हेच पाणी मिनरल वॉटरच्या नावाखाली पुरविले जाते. नागरिकही डोळे झाकून हे पाणी पित आहेत. मात्र या पाण्याचे नमुने तपासले जातात का? आरओ मशीनची गुणवत्ता काय? फिल्टर किती दिवसांनी बदलले जातात? पाण्यात जीवाणू आहेत का? याची चौकशी करणारे कोण? असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.आरोग्य विभाग, अन्न व औषध प्रशासन, भारतीय मानक ब्युरो, वैधमापनशास्त्र विभाग यापैकी कोणताही विभाग जबाबदारी स्वीकारताना दिसत नाही. परिणामी गल्लोगल्ली आरओ प्रकल्पांचे पेव फुटले असून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप होत आहे. शुद्ध व थंडगार पाणी असा दावा करणाऱ्या अनेक पाणी वितरकांकडे कोणतेही प्रमाणपत्र नसल्याचेही बोलले जात आहे. तरीही नागरिकांच्या जीवाशी खेळ करत मनमानी दर आकारले जात आहेत. एकीकडे शुद्धतेची हमी नाही, दुसरीकडे थेट ५० टक्के दरवाढ! त्यामुळे हे पाणी खरंच मिनरल आहे की फक्त थंड केलेले साधे पाणी? असा संतप्त सवाल आता माहूरकर विचारू लागले आहेत. या दरवाढीवर समाजमाध्यमांवरही जोरदार वादळ उठले आहे. माहूर शहरात २० रुपयांत मिळणारी २० लिटर पाण्याची फिल्टर कॅन आता १ जूनपासून ३० रुपयांना करण्याचा निर्णय वॉटर प्लांट धारकांनी घेतला आहे. विशेष म्हणजे नागरिक स्वतः जाऊन पाणी घेऊन आले तरी तोच दर, थंड पाणी घेतले तरी तोच दर आणि नॉर्मल पाणी घेतले तरी तोच दर आकारला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते राजकिरण देशमुख यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना, वॉटर प्लांट चालक मनमानी कारभार करत आहेत. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणार कोण? असा सवाल उपस्थित केला आहे.तर सामाजिक कार्यकर्ते तुषार सूर्यवंशी यांनी म्हटले आहे की, ५०० ते १००० लोकसंख्या असलेल्या छोट्या गावांमध्ये नागरिकांना फक्त ५ रुपयांत २० लिटर शुद्ध फिल्टर पाणी उपलब्ध होते. मात्र तीर्थक्षेत्राचा दर्जा असलेल्या माहूरमध्ये नागरिक आणि भाविकांना महागडे पाणी विकले जात आहे. नगर पंचायत प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणी वॉटर एटीएम, आरओ प्लांट किंवा कमी दरात शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी. माहूरसारख्या महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रात स्वच्छ, सुरक्षित आणि परवडणारे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याची भावना आता सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# रुग्ण व नातेवाईकांसाठी वॉटर फिल्टर विथ कुलरचे दान

नांदेड/प्रतिनिधी-डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी येथे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना स्वच्छ व आरोग्यदायी पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने वॉटर फिल्टर विथ कुलर दान करण्यात आला आहे.





भीषण उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर रुग्ण व नातेवाईकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन हॅपी क्लब व नांदेड शांतता कमिटी यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. अॅड. मोहम्मद कासिम वसीम बाबुसेठ तसेच हॅपी क्लबचे अध्यक्ष मोहम्मद शोहेब यांच्या सहकार्याने बालरोग विभागातील वॉर्ड क्रमांक ७ साठी हा वॉटर फिल्टर विथ कुलर रुग्णालयास प्रदान करण्यात आला.याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार कापसे, बालरोग विभागप्रमुख डॉ. किशोर राठोड, उपवैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवानंद देवसरकर, अधिसेविका बी. आर. मुदीराज यांच्यासह कर्मचारी व रुग्णनातेवाईक उपस्थित होते.

यावेळी अधिष्ठाता डॉ. देशमुख यांनी समाजातील दाते, सामाजिक संस्था आणि सुजाण नागरिकांनी सामाजिक दायित्वाच्या भावनेतून रुग्णालयाला रुग्णोपयोगी साहित्य उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन केले. अशा उपक्रमांमुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना थेट लाभ मिळत असून अधिकाधिक दाते पुढे येऊन आरोग्य सेवेसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. देण्यात आलेल्या साहित्याची योग्य देखभाल व व्यवस्थापन करण्याच्या सूचनाही संबंधित वॉर्डाला देण्यात आल्या. तसेच रुग्ण व नातेवाईकांनी उपलब्ध सुविधांचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले.

# काँग्रेस कार्यालयात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने दि.३१ रविवार रोजी शहर काँग्रेस कमिटी कार्यालयात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी जेष्ठ माजी नगरसेवक गोविंद गोपनपल्ले यांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच त्यांच्या समाजहितकारी कार्याचा व आदर्श शासन कारभाराचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला. या कार्यक्रमास मा. नगरसेवक गोविंद गोपणपल्ले, मा. नगरसेवक गंगाधर डांगे, गटनेता प्रतिनिधी तथा शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण, नांदेड जिल्हा काँग्रेस



कमिटीचे सरचिटणीस गिरीश कोत्तावार, सुभाष चौदंते, शहर युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष वेदांत शेवटे, विठ्ठल आचार्य, सामाजिक कार्यकर्ते रमेश बोडके, शेख गौस भाई फुलवाले, मोईन भाई फुलवाले, गंगाधर पाटील मगरे आणि शेख अनिस भाई नायगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आदर्श समाजाने घ्यावा, असे मत व्यक्त केले. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




मौजे खुजडा शिवारातील नदीघाटातून अवैधरित्या रेती वाहतूक करणारे टिप्पर मुदखेड पोलीसांनी रविवारी पकडले असून वाहन चालकास अटक केली आहे.

# चक्रधर स्वामी नगर-सिंचन नगरातील नागरिकांच्या एकजुटीचा विजय

## अखेर नवीन विद्युत रोहित्र उभारले;अंधाराचा प्रश्न मार्गी

नांदेड/प्रतिनिधी-मागील महिनाभरापासून मालेगाव रोडवरील चक्रधर स्वामी नगर व सिंचन नगर परिसरातील नागरिकांना बंद पडलेल्या पथदिव्यांमुळे आणि वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र स्थानिक नागरिक, मराठवाडा लोकविकास समन्वय संघर्ष समिती आणि प्रशासनाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून या भागात नवीन विद्युत रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) उभारण्यात आले आहे.

परिसरातील पथदिवे बंद असल्याने महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णांना रात्रीच्या वेळी अंधारातून प्रवास करावा लागत होता. याशिवाय चोऱ्यांच्या घटना, मोकाट श्वानांचा त्रास आणि असुरक्षिततेची भावना वाढली होती. वाढत्या उष्णतेमुळे वीज वापरात झालेल्या वाढीचा परिणाम म्हणून कमी-जास्त विद्युत दाब आणि वारंवार होणाऱ्या अघोषित भारनियमनामुळे नागरिक त्रस्त झाले होते.या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी मराठवाडा लोकविकास समन्वय संघर्ष समितीने महावितरण कार्यालयात धाव घेतली. नागरिकांच्या मागणीची दखल घेत महावितरणने नवीन विद्युत रोहित्र बसविण्याची प्रक्रिया सुरू केली होती. यासाठी मनपा हद्दीत खांबही उभारण्यात आले; मात्र काही नागरिकांच्या विरोधामुळे पुढील काम महिनाभर रखडले. दरम्यान, सिंचन नगरातील जागरूक नागरिकांनी समितीच्या सहकार्याने महावितरण व जिल्हा प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. हा प्रश्न जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचल्यानंतर उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर व शिंदे यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता घनबहाद्दूर यांना आवश्यक असल्यास पोलीस बंदोबस्तात काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर महावितरणची यंत्रणा तत्काळ कार्यरत झाली. अखेर चक्रधर स्वामी नगर परिसरात मनपाच्या जागेत रस्त्याच्या कडेला नवीन विद्युत रोहित्र उभारण्यात आले. त्यामुळे परिसरातील वीजपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.या यशस्वी प्रयत्नांबद्दल स्थानिक नागरिकांनी जिल्हा प्रशासन, महावितरण, मराठवाडा लोकविकास समन्वय संघर्ष समिती, पोलीस प्रशासन तसेच युवा नगरसेवक योगेश मुंढे यांचे आभार मानले. तसेच वृत्तपत्रांनी या प्रश्नाला सातत्याने वाचा फोडल्याबद्दल त्यांच्याप्रतीही कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. नागरिकांच्या एकजुटीमुळे आणि सकारात्मक पाठपुराव्यामुळे कठीण प्रश्नही मार्गी लागू शकतात, याची प्रचिती या घटनेतून आल्याची भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली.

# कॉ.पवन जगडमवार यांची एसएफआयच्या महाराष्ट्र राज्य कमिटीवर निवड

नांदेड/प्रतिनिधी-स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) चे तीन दिवशीय महाराष्ट्र राज्य अभ्यास शिबिर बेलापूर, नवी मुंबई येथील कॉम्रेड बी. टी. रणदिवे भवन येथे उत्साहात पार पडले. या शिबिराच्या अंतिम दिवशी, महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमधील रिक्त जागा भरण्यात आल्या. यामध्ये नांदेड जिल्ह्यातून कॉ. पवन जगडमवार यांची एसएफआयच्या महाराष्ट्र राज्य कमिटीवर निवड करण्यात आली आहे.



कॉ. पवन जगडमवार यांनी नांदेड जिल्ह्यात 'एसएफआय' संघटना वाढवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे. एसएफआयचे अखिल भारतीय महासचिव सृजन भट्टाचार्य यांच्या हस्ते कॉ. पवन जगडमवार यांना पुस्तक भेट देऊन त्यांचे अधिकृतपणे अभिनंदन करण्यात आले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या विशेष प्रसंगी एसएफआयचे राज्य अध्यक्ष रोहिदास जाधव, राज्य सचिव सोमनाथ निर्मळ, राज्य उपाध्यक्ष मनिषा बल्लाळ, नवनाथ मोरे, विजय लोहबंदे, तसेच राज्य सहसचिव मल्लेशम कारमपुरी, लहू खारगे, राज्य सचिवमंडळ सदस्य निशा साबळे, मीना आरसे, संदीप मरभळ, अशोक शेरकर, रितेश चोपडे यांच्यासह राज्य कमिटीचे अनेक प्रमुख सदस्य व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले विद्यार्थी-कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कॉ. पवन जगडमवार यांच्या या निवडीबद्दल नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थी चळवळीतून आणि शैक्षणिक वर्तुळातून मोठे कौतुक व आनंद व्यक्त होत आहे.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी अर्चित नाईक यांची नियुक्ती

माहूर/प्रतिनिधी- महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे साहेब यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष महेबूब भाई शेख यांनी पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते अर्चित नाईक यांची नियुक्ती केली आहे. दि.३१ मे रोजी मुंबई येथील पक्ष कार्यालयात त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. जिल्हा कार्याध्यक्ष बंटी पाटील जोमडे, यांची उपस्थिती होती.

या नियुक्तीमुळे माहूर-किनवट तालुक्यात पक्ष संघटनेत नवचैतन्य निर्माण होणार असून युवकांमध्ये पक्षाची ताकद अधिक वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दिवंगत आ.प्रदीप नाईक यांचा राजकीय वारसा लाभलेले अर्चित नाईक हे मागील १५ वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत. पक्षाच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रश्न मार्गी लावत खा. शरदचंद्र पवार, संसदरत्न खा. सुप्रिया ताई सुळे आणि पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्या विचारांना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याची जबाबदारी युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब भाई शेख यांनी त्यांच्यावर सोपविली आहे. या नियुक्तीबद्दल विविध स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून आगामी काळात ते पक्षाच्या वाढीसाठी प्रभावी काम करतील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या बेबीताई नाईक यांनी व्यक्त केला आहे. नियुक्तीबाबत प्रतिक्रिया देताना अर्चित नाईक यांनी, स्वर्गीय आ.प्रदीप नाईक यांचे आशीर्वाद आणि आमच्या नेत्या बेबीताई प्रदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाला पूर्वीचे दिवस आणण्यासाठी जीवाचे रान करू, असा विश्वास व्यक्त केला.

# रामतीर्थ पोलीस स्टेशन हद्दीत चोरीच्या व अपघातग्रस्त मोटारसायकलींचा प्रश्न ऐरणीवर

## मूळ मालकांचा शोध घेण्याकडे दुर्लक्ष?

नायगाव/प्रतिनिधी-रामतीर्थ पोलीस स्टेशनच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात चोरीच्या तसेच विविध अपघातांमध्ये जप्त करण्यात आलेल्या मोटारसायकली पडून असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. अनेक वाहनांचे मूळ मालक अद्यापही शोधले गेले नसल्याचे बोलले जात असून, संबंधित वाहनांची पडताळणी करून ती मूळ मालकांच्या ताब्यात देण्याबाबत प्रशासनाकडून अपेक्षित गती दिसून येत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

पोलीस कारवाईदरम्यान जप्त झालेल्या अथवा अपघातानंतर पोलीस ताब्यात आलेल्या अनेक दुचाकी वर्षानुवर्षे पोलीस ठाण्याच्या आवारात पडून राहतात. त्यामुळे वाहनांची मोठ्या प्रमाणात नासधूस होत असून, अनेक वाहने गंजून निकामी होण्याच्या मार्गावर आहेत. चेसिस क्रमांक, इंजिन क्रमांक व वाहन नोंदणीच्या आधारे मूळ मालकांचा शोध घेऊन त्यांना वाहने परत देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.चोरीस गेलेली वाहने शोधून काढणे आणि आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ती मालकांच्या ताब्यात देणे ही पोलीस प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी मानली जाते. मात्र, अनेक वाहने दीर्घकाळ पोलीस ठाण्याच्या आवारातच पडून असल्याने या प्रक्रियेकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.स्थानिक नागरिकांच्या मते, जप्त वाहनांचा नियमित आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढल्यास मूळ मालकांना न्याय मिळेल तसेच पोलीस ठाण्यातील जागेची समस्याही मोठ्या प्रमाणात कमी होईल. याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष घालून जप्त वाहनांची माहिती सार्वजनिक करावी व मूळ मालकांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी पुढे येत आहे.



# अतिवृष्टीने कंबरडे मोडले:कापूस पीक विम्याबाबत शासन 'तळ्यात-मळ्यात'

## मांडवी परिसरातील शेतकऱ्यांत तीव्र असंतोष



मांडवी/प्रतिनिधी-खरीप हंगाम २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे कापूस, सोयाबीन, मूग आणि उडीद या पिकांचे अतोनात नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर शासनाने ओला दुष्काळ जाहीर केला, तसेच सोयाबीन, मूग व उडीद या पिकांसाठी पीक विमा मंजूर करून शेतकऱ्यांना काहीसा दिलासा दिला. मात्र, या भागातील मुख्य आणि सर्वाधिक खर्चिक असलेल्या कापूस पिकाच्या विम्याबाबत अद्यापही 'तळ्यात-मळ्यात' भूमिका घेतली जात असल्याने, परिसरातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

मांडवी आणि परिसर प्रामुख्याने कोरडवाहू शेतीचा भाग म्हणून ओळखला जातो. त्यामुळे येथील शेतकरी नगदी व मुख्य पीक म्हणून कापसालाच सर्वाधिक प्राधान्य देतात. सन २०२५ च्या खरीप हंगामातही बहुतांश शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने कापसाची विक्रमी लागवड केली होती. मात्र, निसर्गाच्या कोपामुळे आणि सततच्या अतिवृष्टीमुळे कापसाचे पीक पूर्णपणे हातातून गेले.अतित्वृष्टीमुळे यंदा कापसाचे उत्पादन एकरी अवघे १ ते २ क्विंटल इतकेच आले. यामुळे लागवडीचा आणि खता-बियाणांचा खर्चही निघू शकला नसल्याने शेतकरी पूर्णपणे आर्थिक कोंडीत सापडला आहे. शासकीय नियमांनुसार, खरीप हंगाम २०२५ ची पिकांची आणेवारी ५० पैशांच्या (टक्क्यांच्या) आत आलेली आहे. म्हणजेच कापूस पिकाचे नुकसान शासकीय पातळीवरही मान्य करण्यात आले आहे. असे असूनही, शासन आणि पीक विमा कंपन्या कापूस पीक विम्याबाबत कोणतीही स्पष्ट भूमिका जाहीर करायला तयार नाहीत. या परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांनी कर्ज काढून आणि दागिने गहाण ठेवून कापूस पिकाचा विमा उतरवला होता. आता इतर पिकांना विमा मिळत असताना, मुख्य कापूस पिकाला विमा मिळणार की नाही? या संभ्रमावस्थेमुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. कापूस पिकाचा विमा तात्काळ मंजूर करण्यात यावा., कोणत्याही तांत्रिक त्रुटी न काढता पीक विम्याची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी. अशी मागणी शेतकऱ्यांतून केली असून आम्ही आधीच अतिवृष्टीने उद्ध्वस्त झालो आहोत. शासनाने सोयाबीनप्रमाणे कापसालाही तात्काळ न्याय द्यावा, अन्यथा येत्या काळात प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही यावेळी शेतकऱ्यांनी दिला.

# नव्याने झालेला कुरुडगी ते नरंगल रस्ता जेसीबीने उखडला

## ग्रामस्थांचे उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण



देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील कुरुडगी ते नरंगल या स्वातंत्र्यानंतर प्रथमच डांबरीकरण करण्यात आलेल्या रस्त्याचे जेसीबीद्वारे खोदकाम करून नुकसान केल्याचा आरोप करत कुरुडगी येथील ग्रामस्थांनी देगलूर उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. खोदण्यात आलेला बेकायदेशीर नाला तात्काळ बुजवून रस्ता पूर्ववत दुरुस्त करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावातील एका व्यक्तीने सत्तेचा गैरवापर करून रातोरात जेसीबी मशीनच्या साहाय्याने रस्त्यालगत बेकायदेशीरपणे नाला खोलीकरणाचे काम केले. त्यामुळे नव्याने तयार झालेल्या डांबरी रस्त्याचे मोठे नुकसान झाले असून रस्त्यालगत असलेल्या वीज खांबांचा आधारही कमी झाला आहे. परिणामी हे खांब कोसळून वीजपुरवठा खंडित होण्याचा धोका निर्माण झाला आहे. तसेच खोदलेल्या नाल्यात पावसाचे पाणी साचून रस्ता वाहून जाण्याची शक्यता असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय पदाधिकारी, माजी सरपंच, माजी उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी व शेतमजूर मोठ्या संख्येने उपोषणात सहभागी झाले आहेत.दरम्यान, प्रशासनाने तातडीने कारवाई करून नाला बुजवून रस्ता दुरुस्त करावा, अन्यथा २ जून रोजी नांदेड-हैदराबाद महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे.या आमरण उपोषणाला शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, शहरप्रमुख भगवान जाधव, युवा सेना शहर समन्वयक संतोष कांबळे यांनी भेट देऊन शिवसेनेच्या वतीने पाठिंबा जाहीर केला. उपोषणात उमाकांत पाटील, मधुकर पाटील, बाबुराव पाटील, राजेंद्र पाटील, व्यंकट पाटील, माणिकराव कोकाटे, दिगंबर कोकले, विठ्ठल मजरे, नागनाथ मजरे, शिवलिंग अप्पा महादेवरन, राजेंद्र रेवपवार, गणपत कोकणे, शेषेराव मजरे, मारोतराव मजरे, माधवराव कोकणे, संभप्पा स्वामी, महादप्पा स्वामी, माधव शेटकार, बालाजी कोकणे, नामदेव मजरे, सुभाष शेटकार, रमेश शेटकार यांच्यासह सुमारे १०० नागरिक सहभागी झाले आहेत. ग्रामस्थांच्या या आंदोलनाकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले असून प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

# पेट्रोलची १४० ते १५० रुपये लिटरने खुलेआम विक्री

देगलूर/प्रतिनिधी-एकीकडे पेट्रोल पंपावर नॉन स्टॉप चे बोर्ड, तर दुसरीकडे गावागावात व शहरांमध्ये बाटलीतून पेट्रोल १४० ते १५० रुपये लिटरने विक्री देगलूर तालुक्यात पेट्रोलचा फायदा घेत कळा बाजारात तेजीत आला असून सर्वसामान्यांना पेट्रोल मिळणे कठीण झाले आहे.

देगलूर तालुक्यात पेट्रोलची कृत्रिम टंचाई निर्माण झाली आहे. याचा फायदा घेत खानापूर फाटा व जळगाव परिसरात व देगलूर शहरातील अनेक किराणा दुकानांमध्ये व परिसरात १४० रुपये लिटर गोजेगाव कावळगाव, मरखेल, हाणेगाव, या भागामध्ये १५० रुपये लिटर दराने चढ्या भावाने पेट्रोलची खुल्या विक्री सुरू आहे. सरकारी दरापेक्षा ३५ ते ४५ रुपये प्रति लिटर जादा दराने विक्री होत असल्याने नागरिकात तीव्र संताप व्यक्त होत आहे. देगलूर शहर व ग्रामीण भागातील बहुतेक पेट्रोल पंपावर पेट्रोल नाही. अशी पाटी लावलेली दिसते. मात्र त्याचवेळी रस्त्याच्या कडेला पान टपरीवर किराणा दुकानात प्लास्टिकच्या बाटलीतून पेट्रोल विकली जात आहे. शेतकरी विद्यार्थी व नोकरदार वर्गाला नाही. नाईलाजाने तिप्पट दराने पेट्रोल घ्यावे लागत आहे.बाईकला किक मारायची म्हटलं की खिशाला कात्री लागते. कामावर जायचं कसं? असा सवाल नागरिक विचारत आहेत. त्यांचाही असताना काळा बाजारात पेट्रोल येतो कुठून? टँकरची तपासणी होते क? खुलेआम बाटलीतून पेट्रोल विक्री होते, गुन्हे का दाखल होत नाही? देगलूर तालुक्यात पेट्रोलचा का? पर्यायी व्यवस्था का? असा सवाल नागरिक करीत आहेत. दरम्यान प्रशासनाने तात्काळ छापे टाकून कारवाई करावी, अशी मागणी देगलूर शहर व तालुक्यातील दुचाकीस्वार करीत आहेत. पेट्रोलचा साठा करून चढा दराने विक्री करणे कायद्याने गुन्हा आहे. तरीही खुलेआम काळाबाजार सुरू आहे. पुरवठा विभाग व पोलिसांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने काळाबाजार करणाऱ्यांचे फावते आहे. त्यांकडे येतात कुठून ? साठा करतो कोण? याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी होत आहे. देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. गेल्या बारा ते तेरा दिवसात आजपर्यंत त्यांना पेट्रोलच्या दरात वाढ करण्यात आली आहे. आतापर्यंत पेट्रोलच्या दरात सात रुपये पेक्षा जास्त वाढ झाली आहे.

## जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-बोंढार जवळ सुरु असलेल्या जुगार अड्डयावर ग्रामीण पोलीसांनी धाड टाकुन ३ लाख २१ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

बोंढार रोडवरील एका शेतात जुगार अड्डा सुरु होता. रविवारी सायंकाळी नांदेड ग्रामीण पोलीसांचे पथक जुगार अड्डयावर धाड टाकण्यासाठी गेले असतांना पोलीसांना बघुन आरोपी पळून गेले. घटनास्थळावरुन पोलीसांनी रोख रक्कम, ३ दुचाकी असा ३ लाख २१ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी सात जणांविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मावीकसंच्या नांदेड सर्कल अध्यक्षपदी रामकिशोर पवार तर सचिवपदी नितीन भालेराव

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या नांदेड सर्कलच्या अध्यक्षपदी रामकिशोर पवार तर सचिवपदी नितीन भालेराव यांची निवड एका बैठकीत करण्यात आली आहे.





मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या नांदेड सर्कलच्या कार्यकारिणीची निवड करण्यासाठी सभासदांची एक महत्वपूर्ण बैठक सहयोगनगर येथील बौद्ध विहाराच्या प्रांगणात दि.३० मे रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला संघटनेचे केंद्रीय उपाध्यक्ष विनायकराव ढवळे, नांदेड परिमंडळ अध्यक्ष शंकर घुले व परिमंडळ सचिव रामेश्वर कवठेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत सर्वानुमते संघटनेच्या नांदेड सर्कल अध्यक्षपदी रामकिशोर पवार, सचिवपदी नितीन भालेराव यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी मनोज जोंधळे, त्रिशरण सोनकांबळे, पुंडलिक कांबळे, प्रशांत कांबळे, मुख्य संघटक उत्तम सूर्यवंशी, सदानंद कांबळे, मुख्य सल्लागार ए. पी. राठोड, स्वप्निल नगारे, सहसचिव राजू मिरगेवाड, बालाजी जाधव, प्रसिद्धी प्रमुख विजय राठोड, कोषाध्यक्ष शहाबाज शेख, महिला प्रतिनिधी सुद्धा प्रकाश जोंधळे, ज्योती कापसिकर, कार्यकारणी सदस्य सिद्धार्थ गंगाराम कांबळे, गणेश यशवंतराव नाईक, अब्दुल रहीम अब्दुल गणी, साईनाथ राचलवाड यांची निवड करण्यात आली आहे.

# कृषी केंद्राकडून कच्च्या पावत्यांचा खेळ

## खत-बियाणे विक्रीतील सक्तीमुळे शेतकरी अडचणीत

माहूर/प्रतिनिधी-खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात शेतकऱ्यांची शेतीमशागतीसोबत बियाणे व खत खरेदीसाठी धावपळ सुरू झाली आहे. मात्र याच काळात बाजारात बोगस, अप्रमाणित आणि विनापरवाना बियाण्यांची विक्री वाढण्याची शक्यता निर्माण झाली असून शेतकऱ्यांनी अधिक सतर्क राहण्याची गरज व्यक्त होत आहे. एका चुकीच्या खरेदीमुळे संपूर्ण हंगाम धोक्यात येऊन मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते.

कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना पाच सुवर्ण नियम पाळण्याचे आवाहन करण्यात येत असताना दुसरीकडे काही कृषी सेवा केंद्रांमध्ये वेगळेच चित्र पाहायला मिळत आहे. आमच्या दुकानातून बियाणे घेतल्याशिवाय खत मिळणार नाही अशी सक्ती काही विक्रेत्यांकडून केली जात असल्याची ओरड शेतकरी करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या निवडीचे स्वातंत्र्य हिरावले जात असून त्यांची आर्थिक व मानसिक कोंडी होत असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे खत विक्रीवेळी जीएसटी क्रमांकासह संगणकीकृत व छापील बिल देणे बंधनकारक असतानाही अनेक ठिकाणी केवळ कच्च्या पावत्या दिल्या जात असल्याचे शेतकरी सांगतात. काही विक्रेत्यांकडून निर्धारित दरापेक्षा अधिक किंमत आकारली जात असल्याची तक्रारही खाजगीत शेतकऱ्यांनी व्यक्त केली. त्यामुळे कृषी निविष्ठांच्या विक्रीतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, बियाणे नेहमी परवानाधारक व मान्यताप्राप्त विक्रेत्याकडूनच खरेदी करावे. खरेदीवेळी पक्के बिल घेणे अत्यावश्यक असून त्यावर लॉट नंबर, कंपनीचे नाव, बियाण्याचा प्रकार, तारीख, किंमत व विक्रेत्याची स्वाक्षरी असणे गरजेचे आहे. बियाण्याच्या पाकिटावरील शासकीय टॅग, एक्सपायरी डेट आणि सीलबंद स्थितीची खात्री करावी. पेरणीनंतर रिकामे पाकीट व बिल पीक हातात येईपर्यंत जतन करून ठेवण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. तसेच थोडे बियाणे नमुना म्हणून वेगळे ठेवावे, जेणेकरून उगवण न झाल्यास पुरावा म्हणून त्याचा उपयोग करता येईल. खरीप हंगामाच्या तोंडावर बोगस बियाणे, खतांचा काळाबाजार, कच्च्या पावत्यांचा वापर आणि सक्तीची विक्री या मुद्द्यांनी आता गंभीर स्वरूप धारण केले असून कृषी विभागाने याकडे तातडीने लक्ष देऊन कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# इस्लापूर येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती उत्साहात साजरी




किनवट/प्रतिनिधी-राजमाता, राष्ट्रमाता, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३०१ वी जयंती इस्लापूर येथे उत्साहात साजरी करण्यात आली. ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांच्या नियोजित पुतळा चौकात संपन्न झालेल्या जयंती सोहळ्यात इस्लापूरसह सभोवतालच्या समाजबांधवांसह मान्यवरांची उपस्थिती दिसून आली.

प्रारंभी पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे बालाजी आलेवार यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. यानंतर ध्वजारोहण करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन चरित्रावर सखोल मार्गदर्शन करून सर्वांनी रोजच्या जीवनात आदर्श घ्यावा असे संबोधले.या कार्यक्रमास नारायण शिंनगारे, निर्गुण हराळे, अविनाश हराळे, खंडेराव गुंडे, हाडे साहेब, अतिक पटेल, आश्विन शिंदे, रवी कसबे, राजेश साखरे, आत्माराम शिकरे, जावेद घोडके, नितीन नरोटे, अतुल सावकार, पत्रकार मारोती शेळके, ईश्वर जाधव, परमेश्वर पेशवे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन खैरनार सर यांनी केले. तर आभार शेवटी खंडू हाडे यांनी मानले. यावेळी या जयंतीच्या निमित्ताने समाज बांधवांच्या वतीने खिचडी वाटप करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाज बांधवासह सर्व नवयुवकांनी परिश्रम घेतल्याचे सांगण्यात आले.

## भाजप शिवसेनेचे मुंडके उडवत आहे-अब्दुल सत्तार

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी: छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात भाजपने सुहास शिरसाट यांना उमेदवारी दिल्यानंतर शिवसेना नेते अब्दुल सत्तार यांचे पुत्र समीर सत्तार यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या घडामोडीनंतर अब्दुल सत्तार यांनी भाजपवर थेट निशाणा साधत खळबळजनक आरोप केले आहेत. सत्तार म्हणाले की, शिवसेनेचे मुंडके उडवण्याचे काम आमचाच मित्रपक्ष करत आहे. गुवाहाटीतील त्याग भाजप विसरली आहे.

पान १ वरुन

### विधानपरिषदेसाठी अमरनाथ राजूरकर,...

जिल्हाप्रमुख ज्योतीबा खराटे यांनीही आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. महाविकास आघाडीमध्ये चर्चेचे गुऱ्हाळ सुरुच असून काँग्रेस व शिवसेना (उबाठा) च्यावतीने उमेदवारी दाखल करण्यात आली आहे. भाजपच्या विरोधात एकच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्यासाठी गेल्या दहा दिवसांपासून बैठका व चर्चा सुरु आहेत. परंतु अजूनही अंतिम निर्णय झालेला नाही. मंगळवारी उमेदवारी अर्जाची छाननी होणार असून दि.४ जून पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. त्यानंतरच निवडणुकीचे खरे चित्र स्पष्ट होणार असून आतापासूनच मात्र मतदारांची जुळवाजुळव सुरु झाली आहे.

### 'लाडकी बहिण'अपात्रतेवरुन...

आणखी लाभार्थी महिलांना विविध कारणे देऊन वगळले जाऊ शकते, अशी शंका व्यक्त केली आहे. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनीही सरकारवर टीकेची झोड उठवली. निवडणुकीसाठी योजनेचा वापर करण्यात आला आणि निवडणुका संपल्यानंतर महिलांना वाऱ्यावर सोडले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. लाडक्या बहिणींना दिलेली आश्वासने आता हवेत विरत असल्याची टीका केली. या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण रंगले आहे. योजनेतील अपात्रतेबाबत सरकार पुढे कोणती भूमिका घेते, याकडे लाखो महिलांचे लक्ष लागले आहे.

### कॉकरोच जनता पार्टीचे...

पुढील सुनावणी ६ जुलै रोजी होणार आहे. सीजेपीचे मूळ एक्स खाते २१ मे रोजी बंद करण्यात आले. त्यावेळी त्या खात्याचे सुमारे १.९३ लाख फॉलोअर्स होते. खाते बंद झाल्यानंतर संस्थेने तातडीने नवीन खाते सुरू केले. दरम्यान, एका भाजप कार्यकर्त्याने अभिजीत दीपके यांच्या भारतात प्रत्यार्पणाची मागणी करत अलाहाबाद उच्च न्यायालयातही याचिका दाखल केल्याची माहिती समोर आली आहे. अभिजीत दीपके यांच्या भारतात परतण्याच्या घोषणेमुळे आणि जंतर-मंतरवरील प्रस्तावित आंदोलनामुळे कॉकरोच जनता पार्टी पुन्हा एकदा राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे.

# पी.व्ही.कुलकर्णींच्या अवैध बांधकामावर 'नीट'हातोडा

बीड:देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणातील कथित मास्टरमाईंड पी.व्ही.कुलकर्णी याच्याविरोधात प्रशासनाने मोठी कारवाई सुरू केली आहे. बीड शहरातील शाहूनगर परिसरात उभारण्यात येत असलेल्या त्याच्या चार मजली इमारतीच्या अनधिकृत बांधकामावर अखेर हातोडा चालविण्यात आला असून पाडकामाची प्रक्रिया सुरू झाली आहे.

नगरपालिका प्रशासनाने संबंधित बांधकाम अनधिकृत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ठेकेदाराला स्वतःहून बांधकाम पाडून घेण्याची नोटीस बजावली होती. नोटीसीत दिलेली मुदत संपल्यानंतर सोमवारी या इमारतीच्या पाडकामाला सुरुवात करण्यात आली. विशेष म्हणजे संबंधित ठेकेदाराकडूनच हे अनधिकृत बांधकाम हटविण्याचे काम सुरू आहे.नीट पेपरफुटी घोटाळ्यात लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ झाल्याचा आरोप असून या प्रकरणात सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांचे नाव समोर आल्यानंतर केंद्रीय अन्वेषण विभागाने त्यांना अटक केली होती. त्यानंतर तपासाची व्याप्ती वाढत असताना बीडमधील त्यांच्या सुरू असलेल्या बांधकामाचीही चौकशी करण्यात आली. त्यात अनियमितता आढळल्यानंतर पालिका प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला.दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणात लातूरमधील आरसीसी क्लासेसचे प्रा. शिवराज मोटेगावकर आणि प्रा.पी.व्ही. कुलकर्णी यांना न्यायालयाने १० जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर येत असून, लातूरमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांच्या फ्लॅटवर कुलकर्णी विशेष वर्ग घेत असल्याची माहिती उघड झाली आहे.तसेच मोटेगावकर यांच्या क्लासेसमध्ये प्लॅटिनम गोल्ड बॅच नावाने विशेष बॅच चालविली जात असल्याचेही तपासात समोर आले आहे. या बॅचसाठी विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात शुल्क आकारले जात असल्याची माहिती मिळाली आहे. कुलकर्णी, मोटेगावकर आणि शिरुरे यांच्यातील कथित संबंधांचा तपास सीबीआयकडून सुरू आहे. नीट पेपरफुटी प्रकरणाचे महाराष्ट्र कनेक्शन समोर आल्यानंतर सीबीआयच्या तपासाची सूत्रे लातूरपर्यंत पोहोचली. तपासात पुण्यात ब्युटी पार्लर चालविणाऱ्या मनीषा वाघमारे हिच्याशी कुलकर्णीचा संपर्क असल्याची माहिती समोर आली. त्यानंतर कुलकर्णीची सखोल चौकशी करण्यात आली. कुलकर्णी हा मूळ बीड जिल्ह्यातील असून लातूरच्या कैलासनगर भागात वास्तव्यास होता. त्याचे कुटुंब सध्या पुण्यात राहत असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे.दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणातील तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतशा नव्या बाबी समोर येत असून संबंधित आरोपींवरील कारवाईचा फास आणखी आवळला जात आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४